**नि.क्र.५ खालील आदेश**

(दिनांकः ०४/०२/२०२६ रोजी पारीत)

१. अर्जदार यांनी मुळ अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा, २००५ च्या कलम १२ अन्वये केला असून प्रस्तुतचा अर्ज अंतरीम पोटगीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे आहे की, अर्जदार व सामनेवाला नं. १ चे लग्न दिनांक २९/५/२०२० रोजी झाल्यानंतर अर्जदार ही जाबदार नं. १ कडे सासरी नांदणेस गेली. अर्जदार ही जाबदार कडे नांदत असताना सामनेवाला नं. १ हा अर्जदारास शरीरीसुख देण्यासाठी असमर्थ आहे अशी अर्जदाराची खात्री झाल्यानंतर माहेरी राहु लागली. अशी परिस्थिती असतांना जाबदार नं. १ ते ६ हे अर्जदारावर दबाव टाकुन नांदायला येणेसाठी सामनेवाली नं. २ हिने अर्जदाराचे माहेरी येवुन अर्जदाराचे आई वडिलांना "*तुम्ही जर मुलगी सासरी नांदावयास पाठवली नाही तर मी तुमचे शेतातील विहीरीत जिव देईन*" असा दम दिला म्हणून अर्जदार हिने दिनांक २२/६/२०२२ रोजी पाथर्डी पोलीस स्टेशनला सामनेवाली विरुध्द तक्रार दिली होती. अर्जदार ही माहेरी आई वडिलांकडे रहात असले पासुन जाबदार नं. १ याने तिची कुठलीही अन्नवस्त्र, निवारा ची सोय केलेली नाही, पोटगीपोटी रक्कम अदा केलेली नाही. तसेच, तिला कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही.

३. अर्जदारास सामनेवाला नं. १ याने शारिरीक सुखापासुन वंचीत ठेवुन उलट

अर्जदारा विरुध्द मे. दिवाणी न्यायालय अहमदनगर (वरिष्ठ स्तर) यांचे कोर्टात खोट्या मजकुराचा हिंदु विवाह कायदा १९५५ कलम ९ प्रमाणे अर्ज करुन सामनेवाला यास आपण वैवाहीक जिवनामध्ये असमर्थ आहोत याची पुरेपुर माहिती असतांना देखील खोट्यानाट्या मजकुराचा अर्ज न्यायालयात दाखल करुन अर्जदारास मानसीक, शारिरीक, आर्थिक दृष्ट्या छळवणुक चालु केली आहे. सामनेवाला कडे बागायत जिरायत मिळुन १२ एकर जमीन असुन त्या जमिनीमध्ये तो ऊस, कापुस, गहु, कांदे, बाजरी अशा पिकांपासुन वर्षाला १० ते १५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच जाबदारास दुधाचे धंद्यापासुन वर्षाला ५ लाख रुपये व तिसगांव येथे कोचिंग क्लास चालवतो त्या पासुन महिन्याकाठी ५०,०००/- रुपये उत्पन्न मिळते अशा परिस्थितीत अर्जदारास चांगल्या प्रकारचे उत्पन्नाचे साधन आहे. अशा रितीने जाबदार नं. १ यांची अर्जदार हिस स्वतंत्र पोटगी दरमहा रुपये ३०,०००/- देणेची ऐपत आहे. त्यामुळे सदर मुळ अर्जाचा गुणदोषावर निकाल लागेपावेतो जाबदार नं.१ याने अर्जदारास दरमहा रक्कम रुपये ३०,०००/- इंटेरियम पोटगीची रक्कम देण्याचा जाबदार नं. १ विरुध्द हुकुम होणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे व आवश्यक आहे.

**४.** जाबदार क्र.१ ते ६ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र.१९ ला दाखल करून अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. जाबदारांचे असे कथन आहे की, अर्जदार व जाबदार नं. १ चा विवाह झाला असल्याचे व तो अद्यापपर्यंत सनदशीर मार्गाने संपुष्टात आलेला नाही. विवाहानंतर अर्जदार ही जाबदार नं. १ यांचेकडे

सावरगांव ता. आष्टी येथे नांदण्यास आली. अर्जदार हीचे बीएससी चे शिक्षण चालु असल्यामुळे अर्जदार ही कॉलेजला जाण्याचे बहाण्याने जाबदार चे घरातुन निघुन जावुन तिचे माहेरी थांबत असे. जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही जाबदार  नं. १ यांचे सख्या मामाची मुलगी असुन जाबदार  नं. २ यांची सख्खी भाची असुन जाबदार  नं. ३ या अर्जदार हीच्या मावस आत्या आहेत. तसेच जाबदार  नं. ४ हे अर्जदार हीचे सख्खे आते मामा आहेत व जाबदार  नं. ५ या अर्जदाराच्या आत्या आहेत व जाबदार  नं. ६ हे जाबदार  नं. १ चे जवळचे मित्र आहेत.

**५.** जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही जाबदार नं. १ यांचेकडे नांदत असतांना काही दिवस बऱ्या पैकी नांदली. परंतु अर्जदार ही जाबदार नं. १ कडे नांदत असतांना जाबदार १ व २ यांना उध्दटपणाने बोलत असे व घरामध्ये कोणताही कामधंदा न करणे, तसेच जाबदार  नं. १ व २ यांचा पदोपदी अपमान करत असे. अर्जदार ही जाबदार नं. १ ला म्हणत असे की, *"मला नोकरी वाला नवरा करावयाचा होता, परंतु माझ्या आई वडिलांनी बळजबरीने तुमचे बरोबर लग्न लावुन दिले आहे, मला तुमचे बरोबर संसार प्रपंच करण्याची मुळीच इच्छा नाही,"* . तरी देखील जाबदार  नं. १ हे अर्जदार हीचा सर्व त्रास सहन करुन अर्जदार हीस व्यवस्थीत रित्या नांदवित होते. परंतु अर्जदार हीस जाबदार  १ हे पसंत नसल्या मुळे सन २०२१ मध्ये कोणतेही कारण नसतांना जाबदार नं. २ शी भांडण तंटा करुन कपडेलत्ते व दागदागीने घेवुन अर्जदार ही माहेरी निघुन गेली.

**६.** जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, तद्नंतर जाबदार नं. १ व त्यांचे

कुटुंबीयानी व नातेवाईकांनी अनेक वेळेस अर्जदार हीस नांदविण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार हीने जाबदार व त्याचे कुटुंबीयाचा व नातेवाईकांचा अपमान करुन नांदण्यास येण्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यानंतर अर्जदार हिने दिनांक ०२/०३/२०२२ रोजी मार्फत खोटया कथनाची नोटीस पाठवुन नोटीसीमध्ये जाबदार १ व त्यांचे कुटुंबीयावर खोटे नाटे आरोप करुन जाबदार नं. १ चे चारित्र्यावर शिंतोडे उडवुन जाबदार १ ची समाजामध्ये बदनामी केली. तसेच दिनांक २२/०६/२०२२ रोजी जाबदार नं. १ व त्यांचे कुटुंबीया विरुध्द पाथर्डी पोलीस स्टेशनला अर्जदार हीने खोटया आशयाची तक्रार दिली. जाबदारांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या नोटीसीला उत्तर देऊनही अर्जदार हिने त्याचे प्रतिउत्तर दिले नाही व नांदण्यास आली नाही. पुन्हा दिनांक २८/०३/२०२३ रोजी नोटीस पाठवुन देखील अर्जदार ही जाबदारकडे नांदण्यास आली नाही. जाबदार नं. १ यांस अर्जदार यांचेपासुन संसार सुखाची व शारीरीक सुखाची नितांत गरज असतांना देखील अर्जदार ही वेगवेगळ्या कारणावरुन जाबदार १ यांचा तिरस्कार करुन, " विहीरीत जिव देईल, व तुम्हांला जेलमध्ये पाठविल" अशी धमकी देवुन अर्जदार हीने जाबदार १ यांना डेझर्ट केले आहे. जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हिने जाबदार क्र.१ ने दाखल केलेल्या नांदण्यास येण्याच्या अर्जामध्ये हजर होऊन तिचे म्हणणे दाखल केले आहे.

**७.** जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, जाबदार नं. १ यांना कोणताही कामधंदा करत नसुन जाबदार यांस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही व तसेच त्यांची

वडीलोपार्जीत कोरडवाहु शेतजमीन असुन तेथे पावसाअभावी कोणतेही पिक घेता येत नाही व तसेच जाबदार नं. २ यांची सर्वस्वी जबाबदारी जाबदार नं. १ यांचेवर आहे. अर्जदार हीने स्वतः हुन जाबदार नं. १ यांचा त्याग करुन माहेरी रहात आहे. अर्जदार यांनी जाणुन बजुन जाबदार यांना त्रास व्हावा या दृष्टीने जाबदार यांचेकडुन रक्कम उकळता यावी या करीता खोटया आशयाचा अर्ज सदर न्यायालयात दाखल केलेला असल्याने तो नामंजुर करण्यात यावा.

८. अर्जदार यांचे म्हणण्यांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. डी. सी. पांढरे व जाबदारांतर्फे विधिज्ञ श्री. ए. एन. पठाडे यांचा युक्तीवाद ऐकला. माझे विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणेमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | जाबदारांनी अर्जदार हिच्यावर घरगुती हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते काय ? | – *होकारार्थी* |
| २. | अर्जदार हे अंतरिम पोटगी प्रतिमहिना रक्कम रुपये ३०,०००/– मिळण्यास पात्र आहेत हे सिध्द करतात काय ? असल्यास किती दराने ? | – *अंशतः होकारार्थी रक्कम रु.५०००/– प्रति महिना .* |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | काय आदेश ? | – *अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.* |

## कारणेमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ बाबतः**

**९.** अर्जदारने तिचे कथनाचे पुष्ठर्थ फेरिस्त नि.क्र.३ सोबत अनुक्रमांक १ ला जाबदार क्र.१ ला पाठवलेली दिनांक ०२.०३.२०१३ रोजीच्या नोटीसीची स्थळ प्रत, अनुक्रमांक २ कडे जाबदार क्र.१ ने दिलेले दिनांक १४.०३.२०२३ रोजीचे नोटीसचे उत्तर, अनुक्रमांक ३ ला जाबदार क्र.१ ने अर्जदाराला पाठवलेली दिनांक ३१.०३.२०२३ रोजी नोटीसची प्रत, अनुक्रमांक ४ ला अर्जदाराने दि.०२.०५.२०२३ रोजी दिलेले नोटीसचे उत्तर, अनुक्रमांक ५ ला अदखलपात्र गुन्हा क्र.७१०/२०२२ ची छायांकित प्रत, अनुक्रमांक ६ ला खाते क्र.१३३० चा ८–अ उतारा, अनुक्रमांक ७ ला गट क्र.१९९/अ/१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ८ ला गट क्र.२२७/आ/२ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ९ ला गट क्र.२३१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक १० ला गट क्र.५अ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ११ ला गट क्र.३/अ/१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक १२ ला खाते क्र.२२०८ चा ८–अ उतारा, अनुक्रमांक १३ ला गट क्र.८७/अ/१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक १४ व १५ ला रजिस्टर पोस्टाच्या पावत्या, तसेच निशाणी–२७ कडे उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने पुढे फेरिस्त निशाणी–२९ कडे अनुक्रमांक १

ला दरखास्त क्र.८८/२०२४ मधील अर्जाची व रोजनाम्याची प्रत दाखल केली आहे.

**१०.** जाबदाराने निशाणी–२२ कडे अनुक्रमांक १ ला एच.एम.पी.क्र. १३१/२०२३ मधील निशाणी–१२ कडील अर्जाची व त्यावरील आदेशाची प्रत दाखल केली असुन सदर प्रकरणाच्या रोजनाम्याची ऑनलाईन प्रत दाखल केली आहे. पुढे जाबदाराने निशाणी–२४ कडे त्याचे उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केलेले आहे. पुढे निशाणी–२६ कडे अनुक्रमांक १ ला एच.एम.पी क्र.१३१/२०२३ मधील मुळ अर्जाची व त्यावरील आदेशाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

**११.** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ चे कलम ३ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या दिलेली आहे. कौटुंबिक हिंसाचार कशाला म्हणावे याबाबत या कायद्यात स्पष्टीकरण देण्यात आले आहे. महिलेचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ तसेच शारीरिक, लैंगिक छळ, टोमणे मारणे, मानसिक आणि आर्थिक छळ तसेच हुंड्याची मागणी, त्यासाठी बायकोचा किंवा तिच्या नातेवाईकांचा छळ या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले आहे. मौखिक किंवा भावनिक छळामध्ये महिलेचा अपमान, कमी लेखण्याची कृती, टाकून बोलणे, शिव्याशाप देणे अथवा मूल होत नाही म्हणून उपहास करणे किंवा मुलगा होत नाही म्हणून सातत्याने अपमानित करणे किंवा इजा पोहचविण्याची वारंवार धमकी देणे या बाबींचाही कौटुंबिक छळात समावेश आहे. तसेच त्यातील स्पष्टीकरण १ मधील (IV)(a) मध्ये आर्थिक गैरवर्तन पुढीलप्रमाणे

दिलेले आहे.

*(अ) व्यथित व्यक्ती कोणत्याही अधिनियमान्वये किंवा रूढीने न्यायालयाच्या आदेशान्वये सर्व किंवा कोणत्याही आर्थिक लाभास पात्र असेल किंवा अन्य त–हेने किंवा व्यथित व्यक्तीच्या तिच्या मुलांच्या जरुरीच्या गरजेपोटी यामध्ये घरातील आवश्यक गरजेच्या वस्तू, कोणतेही स्त्रीधन, एकत्र किंवा व्यथित व्यक्तीच्या स्वतंत्र मालकीची मालमत्ता, वापरातील वस्तूंच्या भाडयाची रक्कम आणि निर्वाह यांना हानी पोहचविणे.*

**१२.** प्रस्तुत अर्ज हा महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम २००५ प्रमाणे दाखल केला आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ व २१ अन्वये दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राखाली न्याय मिळावा व महिलांना कौटुंबिक अत्याचाराला बळी पडावे लागू नये व समाजामध्ये अशा प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार घडू नये, या हेतूने केंद्र शासनाने याबाबतचा अधिनियम केलेला आहे. सदरचा अधिनियम हा लाभ मिळवून देणेसाठी तयार केलेला कायदा आहे. सदर कायद्यानुसार व्यथित व्यक्तीवर झालेल्या अत्याचाराबाबत योग्य तो कायदेशीर आदेश करण्याची तरतुद सदर कायद्यामध्ये नमुद आहे.

**१३.** प्रस्तुत प्रकरणामधील दोन्ही पक्षकारांची कथने तसेच, दाखल केलेल्या कागदपत्राच्या अवलोकनावरुन दोन्ही पक्षकारांमधील नातेसंबंध त्यांना मान्य असुन अद्याप त्यांच्या विवाहाचे विच्छेदन झाले नसल्याची बाब देखील पक्षकारांना मान्य आहे. जाबदारांनी दाखल केलेल्या एच.एम.पी. क्र.१३१/२०२३ मधील दिनांक ०३.१०.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्जातील अर्जदाराने जाबदार क्र.१

याच्या नांदण्यास जाण्याकरीता तिला आदेशीत केले असल्याचे दिसुन येते. सदर आदेशानंतर अर्जदार जाबदारांकडे नांदण्यास गेली असल्याबाबत दोन्ही पक्षकारांकडुन कोणतीही कथने किंवा कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आलेली नाहीत.

**१४.** प्रस्तुत अर्जाचा विचार करताना फौ.प्र.सं.कलम १२५ व कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम मधील कलम २० सहकलम २३ यामधील पोटगी देण्याबाबतचा निकष हा वेगवेगळा आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम २०(ड) प्रमाणे फौ.प्र.सं.कलम १२५ च्या अतिरिक्त किंवा त्याला समाविष्ट करुन पोटगी प्रदान करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करत असताना केवळ कलम १२ प्रमाणे प्रथमदर्शनी कौटुंबीक हिंसाचार झाला आहे किंवा कसे ही बाब विचारात घेणे गरजेचे आहे.

**१५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार व जाबदार क्र.१ यांच्यातील नातेसंबंध त्यांना मान्य आहेत. अर्जदाराच्या कथनावरुन तिचा विवाह जाबदार क्र.१ शी दिनांक २९.०५.२०२० रोजी मौजे खेर्डे, ता. पाथर्डी येथे झालेला असुन तिच्याकडे आईवडीलांकडुन नोकरीकरीता पाच लाख रुपयांची मागणी जाबदारांनी केली असल्याची बाब तिच्या कथनामध्ये नमुद आहे. तसेच, तिला जाबदार क्र.१ ने शारीरीक सुखापासुन देखील वंचित ठेवल्याची बाब त्यामध्ये नमुद आहे. तसेच, अर्जदाराने दिनांक ०२.०३.२०२३ रोजी जाबदार क्र.१ ला नोटीस पाठवल्याचे देखील दिसुन येते.

**१६.** याउलट जाबदार क्र.१ च्या कथनाप्रमाणे अर्जदार ही त्यांच्याकडे नांदत असताना कोणतेही काम करत नसे व उध्दटपणे बोलुन जाबदार क्र.१ व २ यांचा वेळोवेळी अपमान करत असे. तसेच, मला नोकरीवाला नवरा करायचा होता परंतु घरच्यांनी बळजबरीने तुमच्यासोबत लग्न लावुन दिले मला तुमच्यासोबत संसार प्रपंच करण्याची मुळीच इच्छा नाही असे म्हणत होती व तरी देखील जाबदार तिला व्यवस्थीत नांदवत होते. तिने दिनांक ०२.०३.२०२२ रोजी खोटया आशयाची नोटीस देऊन जाबदार क्र.१ च्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले असुन जाबदार क्र.१ ने दिनांक २८.०३.२०२३ रोजी नांदण्यास येण्याची नोटीस देऊन देखील अर्जदार नांदण्यास आली नाही. जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, जाबदार क्र.१ ला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन शेती ही कोरडवाहु पाण्या अभावी कोणतेही पिक न घेता येणारी आहे. सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी त्यांची विनंती आहे.

**१७.** अर्जदार व जाबदार यांच्यातील सदर वाद कथनांचा विचार केला असता जाबदार क्र.१ चे असे कथन नाही की, अर्जदार ही तिच्या माहेरी गेल्यानंतर पासुन त्याने तिचे कपडेलत्ते, औषध अथवा दैनंदिन खर्च केला आहे अथवा त्याकरीता कोणतीही तरतुद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार व जाबदार दोघेही उच्चशिक्षीत आहेत. तसेच, प्रस्तुत प्रकरणातील पुरावा अद्याप सुरू व्हावयाचा असल्याने सदर कथने त्यांच्या पुराव्यातुन अधिक स्पष्ट होणार आहेत. जाबदार क्र.१ ने त्याचे पती म्हणुन असलेले कर्तव्य अर्जदाराप्रती पुर्ण केले असल्याचे दिसुन येत

नाही. अर्जदाराचे दैनंदिन गरजांची पुर्तता न करणे हाच म्हणुन एक प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार कलम ३ च्या व्याखेमध्ये स्पष्टीकरण १ मधील (IV)(a) मध्ये आर्थिक गैरवर्तनामध्ये समाविष्ट होते.

**१८.** अशा परिस्थितीमध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या फेरिस्त नि.क्र.३ सोबत अनुक्रमांक ६ ला खाते क्र.१३३० चा ८–अ उतारा, अनुक्रमांक ७ ला गट क्र.१९९/अ/१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ८ ला गट क्र.२२७/आ/२ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ९ ला गट क्र.२३१ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक १० ला गट क्र.५अ चा ७१२ उतारा, अनुक्रमांक ११ ला गट क्र.३/अ/१ चा ७१२ उतारा उतारा यांचे अवलोकन केले असता जाबदार क्र.१ च्या नावे स्वतंत्र क्षेत्र नमुद असुन सदर क्षेत्रामध्ये ज्वारी, कापुस, सोयाबीन, हरभरा, बाजरी, कांदा अशी पिके नमुद आहेत. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये जाबदार क्र.१ ला एकुण १२ एकर शेती असुन त्याला दहा ते पंधरा लाख रुपये उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच, दुधापासुन प्रतिमहिना पन्नास हजार रुपये इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१९.** प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे व तिला दैनंदिन खर्च, कपडेलत्ते व औषधे इत्यादीच्या खर्चाचा विचार करता व जाबदार क्र.१ ला सदर पिकांपासुन प्रतिमहिना मिळणा–या उत्पन्नाचा विचार करता अर्जदाराने विनंती केलेली रक्कम रुपये ३०,०००/– प्रतिमहिना ही विनंती अवास्तव आहे. अर्जदाराचे असे देखील कथन आहे की, तिने स्वतः शास्त्र शाखेतील पदव्युत्तर पदवी हस्तगत केलेली आहे. अशा

परिस्थितीत दोन्ही पक्षकारांची वाद कथने व वर नमुद कागदपत्रांवरुन तसेच, अर्जदार व जाबदार क्र.१ यांनी नमुद केलेल्या त्यांच्या निशाणी–२४ व २७ कडील उत्तरदायित्वाच्या शपथपत्रांवरुन एच.एम.पी.क्र.१३१/२०२३ मधील तात्पुरत्या पोटगीचा रक्कम रुपये १०,०००/– प्रतिमहिना हा आदेश मुळ अर्जासोबत समाप्त झालेला आहे. तसेच, अर्जदार हिला सध्या दैनंदिन गोष्टींकरीता उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. निशाणी–२७ मध्ये अर्जदाराने तिचा महिन्याचा खर्च ३०,०००/– असा नमुद केलेला आहे व जाबदार क्र.१ चे उत्पन्न १५ ते २० लाख रुपये नमुद केलेले आहे. याउलट जाबदार क्र.१ ने निशाणी–२४ कडे त्याचे उत्पन्न ५०,०००/– रुपये असल्याचे नमुद करुन अर्जदार हिला शिक्षिका पदावरुन प्रतिमहिना १०,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केलेले आहे.

**२०.** वरील विवेचनावरुन उपलब्ध कागदपत्रांवरुन जाबदार क्र.१ कडे शेती मधुन उत्पन्न मिळत असल्याचे व याउलट अर्जदार माहेरी राहत असल्यापासुन त्याने तिच्या दैनंदिन गरजा व कपडालत्ता व औषधे यांची कोणतीही व्यवस्था केलेली नसल्याने जाबदार क्र.१ ने पती या नात्याने अर्जदार हिला पोटगी देणे उचित होईल. वर नमुद ७/१२ उता–यांवरुन जाबदाराकडे असलेल्या एकुण क्षेत्राचा विचार करता त्याला प्रतिवर्ष किमान पाच लाख रुपये इतके उत्पन्न खर्च वजा जाता मिळत असावे असे गृहितक मांडता येईल. त्यामुळे जाबदार क्र.१ ने अर्जदार हिला प्रतिमहिना रक्कम रुपये ५,०००/– इतकी अंतरिम पोटगी देणेबाबतचा आदेश करणे उचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी व २ चे उत्तर अंशतः होकारार्थी दिले आहे

व मुद्दा क्र.३ बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार क्र.१ यांनी अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.५०००/– इतकी अंतरिम पोटगी द्यावी.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

***(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लघुलेखकांना तोंडी सांगुन टंकलिखित करण्यात आला व घोषीत करण्यात आला.)***

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2026.02.06 18:14:28 +05'30'

**दि. ०४.०२.२०२६**
**पाथर्डी.**

**(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पाथर्डी.**

मी प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णयामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | मंजुषा राजेंद्र सानप, |
| न्यायालयाचे नांव | शिरीषकुमार दि. वाघमारे,<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र. २,<br>पाथर्डी. |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४.०२.२०२६. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ०४.०२.२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | ०६.०२.२०२६. |